# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राष्ट्रीय आरोग्य तपासणी कार्यक्रमांतर्गत बालकांच्या प्रलंबित हृदय शस्त्रक्रियेबाबत**

**(१) २२०७४ (१७-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य तपासणी कार्यक्रमांतर्गत पुढील पिढी सद्दढ व्हावी यासाठी अंगणवाडीपासून ते शालेय विद्यार्थ्यांची दरवर्षी आरोग्य तपासणी केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विशेष तपासणी अंतर्गत सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात ५५ बालके हृदयरोग शस्त्रक्रियेसाठी निवडण्यात आले असतानाही आरोग्य विभागाच्या ढिसाळपणामुळे त्यापैकी २३ बालकांच्या शस्त्रक्रिया होऊ शकल्या नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे ३२ बालक शस्त्रक्रियेच्या अद्यापर्यंत प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बालकांच्या रखडलेल्या शस्त्रक्रिया करण्याबाबत शासन कोणती तातडीने कार्यवाही करणार आहे वा करीत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२३-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) ते (४) सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये अंगणवाडीस्तर व शालेयस्तरावरील बालकांच्या झालेल्या तपासणीदरम्यान एकुण ३१८५ बालकांना हृदयरोग झाल्याचे आढळून आले. त्यापैकी १४१९ बालकांच्या हृदयरोग शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ४४६ बालकांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत उपलब्ध हॉस्पीटलमध्ये पुढील उपचारांसाठी पाठविण्यात आले. उर्वरित १३२० शिल्लक बालकांपैकी सन २०१७ अखेर ७१२ बालकांच्या हृदयशस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. २८ बालकांच्या शस्त्रक्रियांचा प्रस्ताव महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत उपलब्ध हॉस्पीटलमध्ये पाठविण्यात आला आहे. उर्वरित ५८० बालकांच्या शस्त्रक्रीया खालील नमूद कारणांसाठी करणे शक्य झालेली नाही :-

| | | |
|---|---|---|
| १) | पालक तयार नसणे | - १५७ |
| २) | पाठपुरावा सुरु आहे | - १८६ |
| ३) | वैद्यकीय उपचाराखाली | - ११६ |
| ४) | कार्डीअॅक कॅथद्वारे उपचार सुरु | - १० |
| ५) | आरोग्य दृष्टया सध्या सक्षम नाही | - ७९ |
| ६) | अन्य ठिकाणी स्थलांतरीत | - २० |
| ७) | रुपये १.५ लक्ष च्या पुढील खर्च | - १२ |
| | **एकूण** | **५८०** |

उपरोक्त प्रलंबित हृदय शस्त्रक्रिया पूर्ण करुन घेण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील कोल्हापूरी बंधारे दुरुस्ती अभावी नादुरुस्त झाल्याबाबत

**(२) ६६१२० (१६-१२-२०१६). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील कोल्हापूरी बंधारे सद्यस्थितीत दुरुस्तीअभावी नादुरुस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी तातडीने आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सन २०१८ - १९ मध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राबवावयाच्या जिल्हा स्तरावरील योजनांची यादी शासनाच्या नियोजन विभागाने दि. ०१/०१/२०१८ रोजी प्रसृत केली आहे. त्यामध्ये अनुक्रमांक ४९ ते ५१ वर ० ते २५० हेक्टर प्रकल्पांच्या दुरूस्तीचे प्रावधान आहे. त्यास अनुसरून विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या दिनांक ०१/०२/२०१८ रोजीच्या अर्धशासकिय पत्रातील सूचनांनुसार उप जिल्हाधिकारी, (रोहयो), बीड यांनी त्यांच्या दिनांक १७/०२/२०१८ च्या पत्रान्वये बीड जिल्हयातील सर्व संबंधित यंत्रणांना कोल्हापूरी पदधतीच्या बंधा-यांच्या दुरूस्तीबाबत आवश्यक असणा-या निधीची मागणी जिल्हा नियोजन अधिकारी, नियोजन विभाग, बीड यांचेकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या असून लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, बीड व लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, बीड मार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**कुडुस (ता.वाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिकेअभावी एक महिन्याच्या बालिकेचा झालेला मृत्यू**

**(३) ७२३८६ (१०-०१-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडुस (ता.वाडा, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिकेअभावी एक महिन्याच्या बालिकेचा मृत्यू झाल्याची बाब दिनांक २९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्रातील रुग्णवाहिन्यां आठ दिवसांपासून बंद असून त्याकडे संबंधित प्रशासन दुर्लक्ष करित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन संबंधित अधिका-यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी मृत बालिकेचे वडील यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मागणीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, या प्रकारावरुन राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णवाहिन्या तातडीने उपलब्ध करुन देणार आहेत काय ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०५-२०१८) :** (१) दिनांक २९.०९.२०१६ रोजी सदर बालिकेस प्रथम कुडुस येथील एका खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. खाजगी रूग्णालयात ऑक्सिजन नसल्यामुळे तेथील डॉक्टरांनी तिला अत्यंत गंभीर परिस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र, कुडुस येथे पाठविले. परंतु प्राथमिक आरोग्य केंद्रात बालिकेची प्रकृती अतिगंभिर झाल्याने संदर्भसेवेसाठी तिला ग्रामीण रूग्णालय वाडा येथे नेणे आवश्यक होते. प्रा.आ. केंद्रातील रूग्णवाहिका औषधे आणण्यासाठी प्रा.आ.केंद्र, सोमाटा येथे पाठविण्यात आली होती. तर १०८ क्रमांकाच्या रूग्णवाहीकेचे टायर फुटल्याने ती नादुरूस्त होती. तसेच प्रा.आ. केंद्र, वज्रेश्‍वरी येथील १०८ क्रमांकाची रूग्णवाहिका पोहचण्यास ३०-४५ मिनिटांचा कालावधी लागणार होता. त्यामुळे खाजगी वाहनाने ऑक्सिजन लावून सदर बालिकेस ग्रामीण रूग्णालय, वाडा येथे नेण्याची कार्यवाही अवघ्या १० मिनिटात करण्यात आली. परंतु सदर प्रवासादरम्यान तिचा मृत्यू झाला. त्यामुळे रूग्णवाहिका नसली तरी वाहनांची पर्यायी व्यवस्था केली होती. तसेच उपचारामध्ये तिला ऑक्सिजनचा पुरवठा करण्यात आला होता. त्यामुळे सदर बालिकेचा मृत्यू रूग्णवाहिका अथवा उपचाराअभावी झाला अशी वस्तुस्थिती नाही.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्राची रूग्णवाहिका सोमटा येथे लस साठा आणण्यासाठी गेली होती तर प्रा.आ. केंद्राला संलग्न असलेली १०८ क्रमांकाची रूग्णवाहिका टायर फुटल्याने बंद स्थितीत होती. त्यामुळे रूग्णाला खाजगी वाहनाने संदर्भ सेवा देण्यासाठी ग्रामीण रूग्णालय, वाडा येथे नेण्यात आले व त्याचे भाडे प्रा.आ. केंद्राच्या रूग्णकल्याण निधीमधून देण्यात आले. तसेच १०८ रूग्णवाहिकेचे टायर दि. ३०.०९.२०१६ रोजी दुरूस्त करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर मृत्यू प्रकरणी माझी कोणतीही तक्रार नाही असे मयत बालिकेचे वडील यांनी लेखी जबाबाद्वारे नोंदविलेले आहे.

तरीही तालुका आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे.

(४) चौकशी अहवालानुसार प्रा.आ.केंद्र कुडुस येथील वैद्यकीय अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(५) प्रत्येंक प्रा.आ. केंद्राला शासकिय अथवा १०८ क्रमांकाची रूग्णवाहिका कार्यरत राहिल अशी खबरदारी घेण्यात येते.

---

**खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत मॅगजाई बंधाऱ्याच्या कामात झालेली अनियमितता**

**(४) ७४३८८ (१७-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) अंतर्गत मॅगजाई बंधाऱ्याच्या कामात अनियमितता झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधारा बांधण्यासाठी ७० लक्ष रुपये खर्च आला आहे परंतु बंधाऱ्यात पाणी साचत नसल्याने बंधारा निरुपयोगी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार बंधाऱ्याच्या कामात अनियमितता करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) या प्रकरणी भूजल सर्वेक्षण विभागाचे अभिप्राय मागविले असता त्यांनी पाहणी करुन त्यांचे दि. १ डिसेंबर, २०१५ चे पत्रान्वये पाझर तलावाचा उद्देश हा पाणीसाठा दीर्घकाळ पर्यंत रहावा असा नसून पावसाळयामध्ये अडविलेले पाणी जमिनीत मुरावे व त्या भागातील भूगर्भातील पाणीपातळी वाढावी असा आहे. या उद्देशाचे योग्य प्रकारे कार्य सदर तलावाचे ठिकाणी होत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सालेकसा (जि.गोंदिया) येथील कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) या विभागातर्फे लघुपाटबंधाऱ्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(५) ७९१०८ (१५-०४-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा (जि.गोंदिया) येथील मानाकुही तलाव, साठवण तलाव पांढरी, उपसा सिंचन योजना बिजेपार, उपसा सिंचन योजना कोडरा, विदर्भ सधन सिंचन कार्यक्रमाअंतर्गत धरण सुरजाटोला लघुपाटबंधारे तलाव दंडारी ही प्रलंबित कामे करण्याबाबत कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण विभाग) या विभागातर्फे स्थानिक लोकप्रतिनिनिधींनी दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मंत्री (जलसंपदा) यांच्याकडे पत्रव्यवहार करूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची रखडलेली विविध कामे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०५-२०१८) :** (१) ते (३) लघु पाट बंधारे तलाव मानाकुही, उपसा सिंचन योजना बिजेपार, उपसा सिंचन योजना कोटरा या कामांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक असून प्रकल्पांचे सुधारीत अंदाजपत्रके तयार करण्यात येत आहे. लघु पाटबंधारे तलाव सुरजाटोला, लघु पाटबंधारे तलाव दंडारी ही कामे रोहयोतून वगळून विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमाअंतर्गत प्रस्तावित करण्यात आली होती परंतु विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम ही योजना बंद झाल्याने सदर तलावांचे सुप्रमा प्रस्ताव शासन निधीतून देण्याचे विचाराधीन आहे. साठवण तलाव पांढरी चे कामात खाजगी जमीनीची आवश्यकता असून संबंधित शेतकरी जमीन देण्यास तयार नसल्याने काम प्रलंबित आहे. याबाबत उपविभागस्तरावर संबंधित शेतकऱ्यांशी संपर्क साधून त्यांना समजवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील कोल्हापुरी बंधारे निकृष्ट दर्जाचे बांधण्यात आल्याबाबत**

**(६) ८१७९० (१८-०४-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील कोल्हापुरी बंधारे निकृष्ट दर्जाचे बांधण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषी कंत्राटदारावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबणाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२३-०५-२०१८) :** (१) चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील कोल्हापुरी बंधा-याबाबत दैनिक पुण्यनगरी व दैनिक देशोन्नती या वृत्तपत्रात जानेवारी २०१७ मध्ये बातमी प्रकाशित झाली होती.

(२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी दिनांक ७/२/२०१७ च्या पत्रान्वये संयुक्त चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले व त्याअनुषंगाने दोन्ही उपविभागीय अभियंत्यांचे चौकशी अहवाल प्राप्त झाले आहेत. सद्यस्थितीत कंत्राटदार यांचा करारनामा रद्द करण्यात आलेला असून त्यांची सुरक्षा ठेव रक्कम रु.५९,५४७/- शासन खाती जमा करण्यात आलेली आहे. कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. या कामाचे कंत्राटदार यांची नोंदणीकरण प्रमाणपत्राची मुदत दिनांक २७/०७/२०१७ रोजी संपलेली असून यापुढे त्यांना नवीन नोंदणीकरण प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कोंड (ता.जि.उस्मानाबाद) येथील अर्धवट असलेला पाझर तलावाच्या कामांबाबत**

**(७) ८७०१९ (१९-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोंड (ता.जि.उस्मानाबाद) येथील पाझर तलावाच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, या कामावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला व किती तलावांची कामे अपूर्णावस्थेत आहेत,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व हे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०५-२०१८) :** (१) व (२) मौजे कोंड (ता.जि.उस्मानाबाद) येथे रोहयो अंतर्गत १३ पाझर तलावांची कामे हाती घेण्यात आली होती त्यापैकी ११ कामे पूर्ण झाली असून पा.त.क्र. १७ वर रुपये १७.३९ लक्ष इतका व पा.त.क्र. १८ वर रुपये २२.४२ लक्ष असा एकूण रुपये ३९.८१ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

(३) व (४) सदर दाने पाझर तलावाची कामे जुन्या रोजगार हमी योजनेतुन हाती घेण्यात आलेली होती. रोहयो योजना दि.०१/०४/२००८ रोजी बंद करण्यात आली आहे. सदर कामे शासनाच्या इतर योजनेमधून पुर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**रणवरेवाडी (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील लघुपाटबंधारे तलावाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(८) ९०५३७ (२१-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रणवरेवाडी (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील लघुपाटबंधारे तलावासाठी भूसंपादनाचे काम पूर्ण झाले असून वर्क ऑर्डर झाली आहे परंतु अनेक वर्षे झाली या तलावाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाकरिता भूसंपादन पूर्ण झाले असले तरी अद्याप शेतकऱ्यांना भूसंपादनाचे सुमारे २ कोटी रुपये मिळालेले नसून त्यांच्या अनेक अडचणी देखील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार रणवरेवाडी येथील लघुपाटबंधारे तलावाचे काम पूर्ण करण्याबाबत शासानाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०५-२०१८) :** (१), (२) व (३) रणवरेवाडी ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर येथील लघुपाटबंधारे तलावासाठी आवश्यक जमिनी संबंधीत बाधीत शेतकऱ्यांनी विरोध केल्याने भूसंपादन प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. त्याचा अंतिम निकाल दिनांक ९/२/२०१७ रोजी शासनाचे बाजूने लागला आहे. नवीन भूसंपादन अधिनियमानुसार भुसंपादन मोबदला रक्कमेत वाढ झालेने मंजूर अंतिम निवाडा रु.२३४.३६ लक्ष रक्कमेचा आहे. त्यापैकी रु.२२७.५३ लक्ष इतके रक्कम संबंधीत भूसंपादन अधिकारी यांचेकडे वर्ग केले आहे. सद्यस्थितीत तलावाचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आंगवली सोनारवाडी येथील धरणाचे काम बंद असलेबाबत

**(९) ९१५९३ (१९-०८-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आंगवली सोनारवाडी येथील धरणाचे जलसंधारण विभागामार्फत चार वर्षापूर्वी सुरू झालेले काम फक्त खोदाई करण्यात आल्यानंतर बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काम बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर धरणाचे काम सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आंगवली सोनारवाडी ता.संगमेश्वर येथील धरणाच्या संपादित करावयाच्या जमिनीचा भुसंपादन मोबदला प्राप्त न झाल्याने ग्रामस्थांच्या विरोधामुळे योजनेचे काम बंद आहे.

(३) योजनेची प्र.मा. किमत रु.८०२.९५ लक्ष असून भुसंपादनाकरीता आतापर्यंत रु. ४४२.६१ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. अद्याप पर्यंत रु.७६५.६७ लक्ष खर्च झालेला आहे. योजनेच्या भूसंपादनाकरीता रुपये १६९.१८ लक्ष निधीची आवश्यकता असुन खर्च प्र.मा. किमती पेक्षा जास्त होत असल्यामुळे योजनेस सुधारीत मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे देउळगांव घुबे पाझर तलावाच्या गळतीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाल्याबाबत**

**(१०) ९१८४५ (२१-०८-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे देउळगांव घुबे पाझर तलावाच्या गळतीमुळे तसेच ड्रेन नाल्याचे काम न झाल्याने गट नंबर ५४७, ५४३, ५५३ मधील शेतामध्ये पाणी जाऊन जमीनी खराब झाल्याने सदर शेतक-यांनी उपविभागीय अधिकारी, सिंचन उपविभाग (जिल्हा परिषद) देउळगांव राजा, जि.बुलढाणा यांच्याकडे लेखी तक्रार दिली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार पाझर तलावाची गळती थांबविण्यासह शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (११-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद बुलडाणा यांनी दिनांक १६/७/२०१७ रोजी प्रत्यक्ष मोकास्थळी जावुन चौकशी केली आहे.
(३) पाझर तलावातून कोणत्याही प्रकारची गळती आढळून आली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे कुठलेही नुकसान झालेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पाझर नदीवरील काळसेवड-चिंचपाडा येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यांचे कामाबाबत**

**(११) ९१९०४ (१९-०८-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पांझरा नदीवरील काळसेवड-चिंचपाडा येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-यांचे काम सुमारे ८० टक्के पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे उर्वरित बांधकाम सुमारे ५ वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने निधी उपलब्ध करुन देऊन सदर बंधाऱ्याचे काम तातडीने पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०४-०४-२०१८) :** (१) व (२) होय. हे खरे आहे.
(३) कार्यक्षेत्रीय परिस्थितीनुसार कामाच्या परिमाणात वाढ झालेली असल्यामुळे, सदर कामाचे सुधारित अंदाजपत्राकांस तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली असून जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांना दि.२१/३/२०१६ अन्वये सादर केलेला सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील मामा तलावांचे खोलीकरण करून पाण्याची साठवण क्षमता वाढविण्याबाबत**

**(१२) ९२३१४ (१९-०८-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयात ३२५० एवढे मामा तलाव आहेत यांचा २०० वर्षापासून खोलीकरण झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गाळ काढणे, खोलीकरण करणे, तलावांचे पुर्नजीवन करण्यासाठी प्रती हेक्टरी ओलिता साठी फक्त १६ हजार रुपये अनुदान देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपुऱ्या अनुदानाअभावी सदर कामे प्रलंबित असून याबाबत शासनाने अनुदान वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (११-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. गाळ काढणे, खोलीकरण करणे, तलावांचे पुनर्जीवन करणे यासाठी रु.६२८००/- प्रती हेक्टर इतके मापदंड निर्धारीत करुन दिलेले आहेत. यात गाळ काढण्याचे काम यांत्रिकी विभागाकडून अपेक्षित आहे. तथापि, खाजगी यंत्रसामुग्रीचे रु.१००००/- प्रती हेक्टर वरुन रु.१२५००/- उच्चतम मर्यादा दिनांक २४/११/२०१६ च्या पत्रान्वये वाढवून देण्यात आली आहे.
(३) सदर कामे प्रलंबित नाही. दिनांक २१/१/२०१६ च्या पत्रान्वये मामा तलाव दुरुस्तीचे मापदंडात रु.२८०००/- प्रती हेक्टर वरुन रु.६२८००/- प्रती हेक्टर इतकी वाढ करुन दिलेली आहे. यात दुरुस्ती व पुनर्स्थापनाची कामे रु.४८०००/- गाळ काढण्याची कामे रु.१००००/- व आनुषांगिक खर्च रु.४८००/- याचा समावेश होता. यात गाळ काढण्याचे काम शासनाच्या

यांत्रिकी विभागाकडून करणे अपेक्षित होते. परंतू एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर कामे सुरु झाल्यामुळे शासनाकडील यंत्रसामुग्री अपूरी पडू लागल्यामुळे खाजगी यंत्रसामुग्री वापरणे अपरिहार्य असल्यामुळे गाळ काढण्याची कामे करण्याकारीता खाजगी यंत्रसामुग्रीचे रु.१००००/- प्रती हेक्टर वरुन रु.१२५००/- उच्चतम मर्यादा शासनाने दिनांक २४/११/२०१६ च्या पत्रान्वये वाढवून देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने मामा तलावांचे पुनर्जीवन व बळकटीकरणाचे वर्ष २०१६-१७,२०१७-१८ व २०१८-१९ या तीन वर्षाचे नियोजन करण्यात आलेले आहे. लघु सिंचन (जलसंधारण) विभाग व लघु सिंचन, जिल्हा परिषद विभाग, भंडारा येथील नियोजनात असलेली कामे २८१, पुर्ण झालेली कामे ७६ व प्रगतीपथावरील कामे २०५ आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा निहाय नर्सिंग भरती प्रक्रियेबाबत**

**(१३) ९२४९५ (१९-०८-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा निहाय नर्सिंग भरती प्रक्रिया माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पुर्ण करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा निहाय नर्सिंग भरती उद्दिष्ट शासनाने ठरवून दिले आहेत काय,
(३) असल्यास, एस.सी./एस.टी. इत्यादी संवर्ग निहाय उद्दिष्ट देखील ठरविण्यात आले आहे काय असल्यास, धुळे जिल्हयासाठी किती उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे,
(४) नसल्यास, सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) आरोग्य सेवा संचालनालयांतर्गत रुग्ण सेवेशी संबंधित रिक्त पदांच्या ७५ टक्के पदे भरण्यास शासनाने परवानगी दिली आहे. त्यानुसार राज्यातील रुग्णालयात अधिपरिचारीका या संवर्गाच्या एकूण १२८० पदांकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. जिल्हा निहाय नर्सिंग भरती उद्दिष्ट शासनाने ठरवून दिले.
(३) भरती प्रक्रियेअंतर्गत सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदभरती करण्यात आली आहे. धुळे जिल्ह्यात एकूण ८३ पदांकरीता पदभरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. निवड झालेल्या उमेदवारांपैकी एकूण ६८ उमेदवार हजर झालेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे जलसार (ता.जि.पालघर) येथील जलसार, चिखलपाडा, रांजणपाडा,**
**विराथन ब्रु व इतर पाड्यांमध्ये साठवण तलाव बांधण्याबाबत**

**(१४) ९३४९४ (१९-०८-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जलसार (ता.जि.पालघर) येथील जलसार, चिखलपाडा, रांजणपाडा, विराथन ब्रु व इतर पांड्यांना पिण्याच्या पाण्याची टंचाई माहे फेब्रुवारी ते मे पर्यत कायम स्वरुपी भासत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी गट क्र. ६८५ या वनजमिनीवर साठवण तलाव बांधण्यासाठी निधीची मागणी शासनाकडे लोकप्रतिनिधीकडून माहे मे, २०१६ मध्ये केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मौजे जलसार येथील साठवण तलाव बांधण्यासाठी शासनाकडून किती कालावधीमध्ये निधीची पुर्तता करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) होय हे खरे आहे.
(३) सदर काम शासकिय प्रचलित मापदंडात बसत नसल्यामुळे पुढील कार्यवाही करणेत आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या दुरवस्थेबाबत

**(१५) ९४८०८ (११-०८-२०१७). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकूर (जि.लातूर) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात दररोज ४०० ते ५०० रुग्ण उपचारासाठी येत असून तेथे प्रयोगशाळा सहाय्यक नसल्यामुळे रुग्णांना २ दिवस थांबावे लागत आहे तसेच रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात राहत नाही, सहाय्यक अधीक्षक व इतर अनेक पदे रिक्त असून बरेच अधिकारी प्रतिनियुक्ती वर पाठवण्यात आले असल्यामुळे रुग्णाची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कायमस्वरूपी मुख्यालयात राहणा-या कर्मचा-यांची नियुक्ती करून सदर ग्रामीण रुग्णालय कार्यक्षम करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील पाझर तलाव/साठवण तलावाची ४८ कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१६) ९४८८३ (२७-१०-२०१७). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील अटाळी, घारोड-१, घारोड २ व अकोली अशा ४ पाझर तलावांना सन २०११-१२ मध्ये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती ह्या सर्व कामावर मूळ प्रशासकीय मान्यते एवढा खर्च झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात रक्कम खर्च होऊन सुद्धा सदर तलावांच्या सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी नसल्यामुळे कामे प्रलंबित आहेत तसेच कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊन देखील त्याचा शेतकऱ्यांना फायदा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार उपरोक्त ४८ तलावांच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता तात्काळ प्रदान करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (११-०४-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. घारोड-१ तलाव या योजने व्यतिरिक्त तिनही योजनेवर झालेला खर्च प्रशासकीय मान्यता किंमतीचे मर्यादेत आहेत.

(२) व (३) मृद व जलसंधारण विभागाकडे ४२ कामे असून ३४ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली असून त्याचा शेतक-यांना फायदा होत आहे. २ कामे शेतक-यांच्या विरोधामुळे सुरु झालेली नाही. ६ कामे भूसंपादन मोबदल्याच्या अनुषंगाने शेतक-यांच्या विरोधामुळे अपूर्ण आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माकेगाव (ता,रेणापूर, जि.लातूर) येथे साठवण तलावाचे सर्वेक्षण करुन मंजुरी देणेबाबत**

**(१७) ९४९६२ (२०-१२-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माकेगाव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथे साठवण तलावासाठी साईट असल्यामुळे व शेतकऱ्यांची मागणी व संमती असल्याने यापूर्वी मंजूर असलेले पण समत्ती न मिळालेले साठवण तलाव रद्द करून त्याऐवजी सदर ठिकाणी साठवण तलावाचे सर्वेक्षण व कामास मंजुरी देण्याबाबत स्थानिक लोकाप्रतीनिधिनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.जलसंपदा मंत्री, यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुरी देण्यात आलेले परंतु शेतकऱ्यांच्या समत्ती अभावी रखडलेले वा काम सुरु न झालेले किती साठवण तलाव रेणापूर तालुक्यात आहेत व ती कोणती आहेत,

(३) असल्यास, सदर साठवण तलावाची कामे होऊ शकत नसल्यामुळे हि साठवण तलाव रद्द केल्याने या खोऱ्यांतर्गत पाणी उपलब्ध होऊन माकेगाव साठवण तलावास मंजुरी देण्याबाबतची कोणती कार्यवाही शासनाने केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, सदर माकेगाव येथे साठवण तलावाचे सर्वेक्षण व मंजुरीबाबत शासनास किती कालावधी लागणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२३-०५-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) मंजूरी देण्यात आलेले परंतू शेतक-यांच्या संमती अभावी रखडलेले वा काम सुरु न झालेले साठवण तलाव रेणापूर तालुक्यात नाहीत.
(३) व (४) प्रस्तावित माकेगाव साठवण तलाव ता.रेणापूर, जि.लातूर या प्रकल्पास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त होताच प्रकल्पाचे सर्वेक्षण व अन्वेषण हाती घेऊन प्रशासकीय मान्यता घेणेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.कौठा ते रहाटी (ता.कंधार, जि.नांदेड) या रस्त्याच्या मन्याड नदीवरील पूल बांधण्याबाबत**

**(१८) ९६२१४ (२६-१२-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.कौठा ते राहाटी (ता.कंधार, जि.नांदेड) या रस्त्याच्या मन्याड नदीवरी पूल बांधण्यासाठी शासनाने मंजूरी दिली होती तथापि स्थानिक लोकप्रतिनिधीने ग्रामीण रस्त्यावरील पूलवजा कोल्हापूरी बंधाऱ्याची मागणी केली व त्यावर अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ औरंगाबाद यांनी दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या प्रकल्पास जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या मान्यतेअभावी बंधाऱ्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०५-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१७-१८ च्या जिल्हास्तरिय योजनेतून सदरील योजना जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांनी वगळली असल्यामुळे जिल्हाधिकारी यांना या योजनेस प्रशासकिय मान्यता देणे शक्य झाले नाही.
(३) सदर योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वयंसेवी संस्थांना एकापेक्षा अधिक बालगृह चालविण्यास देण्यात आल्याची बाब टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या सर्वेक्षणात आढळून आल्याबाबत**

**(१९) ९६३६१ (२६-१२-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एका स्वयंसेवी संस्थेला एकापेक्षा अधिक बालगृह चालवण्याचा परवाना द्यायचा नाही असे शासनाच्या सन २०१३ च्या नियमात नमूद केले असतानाही अनेक संस्थांना एकापेक्षा अधिक बालगृह चालविण्यास देण्यात आल्याची बाब टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या सर्वेक्षणात माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नियमबाहय काम करणा-या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०६-२०१८) :** (१) असा सर्वेक्षण अहवाल शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील के.एल.ई (बेळगांव) रुग्णालय महात्मा फुले जीवनदायी योजनेमध्ये समावेश करण्याबाबत**

**(२०) ९६९३१ (२७-१२-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील बहुतांशी भागातील जनतेला महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजनेच्या उपचाराकरिता मिरज रुग्णालय लांब पडत असून बेळगांव येथील के.एल.ई रुग्णालय जवळ पडत असल्याने के.एल.ई (बेळगांव) रुग्णालय महात्मा फुले जीवनदायी योजनेमध्ये समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १२ जून, २०१७ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०५-२०१८) :** (१), (२) व (३) विद्यमान (म्हणजेच पुर्वीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये शेजारील राज्यातील खाजगी रूग्णालये अंगीकृत करण्याची तरतूद नाही. त्यामुळे सदर रूग्णालयाचा महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये समावेश करण्यात आला नाही.

---

**पुणे जिल्हयात व शहरात राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये रूग्णांना शस्त्रक्रियेसाठी अल्प मदत देण्यात येत असल्याबाबत**

**(२१) ९९१०१ (०६-०१-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात व शहरात राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये रूग्णांना अल्प मदत केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी रूग्णालयात ज्या शस्त्रक्रियेसाठी किमान ५० हजार रूपयांचा खर्च येतो अशा शस्त्रक्रियांसाठी या योजनेतून फक्त १० हजार ८०० रूपये दिले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शहरात या योजनेमध्ये अत्यंत कमी अशा नामांकीत रूग्णालयांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०५-०३-२०१८) :** (१) हे खरे नाही

(२) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत (तत्कालीन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना) विमा कंपनीसोबत (नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि.) झालेल्या करारानुसार प्रोसिर्जसचे दर निश्चीत करण्यात आले आहेत. तसेच अंगीकृत रूग्णालयाच्या श्रेणीनुसार दाव्यांची रक्कम अदा केली जाते.

(३) हे खरे नाही.

योजनेंतर्गत विमा कंपनीसोबत (नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि.) झालेल्या करारानुसार राज्यात एकूण ४९२ रूग्णालये अंगीकृत करण्यात आली आहेत.

योजनेतील रूग्णालयांचे अंगीकरण ही ऐच्छिक बाब असल्यामुळे इच्छुक रूग्णालये योजनेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करतात व त्यानंतर सदर रूग्णालयांचे निकषांच्या आधारे ऑडिट करण्यात येऊन रूग्णालय अंगीकरण समितीच्या मान्यतेनुसार योजनेंतर्गत रूग्णालयास अंगीकृत केले जाते.

महाराष्ट्र राज्यातील योजनेंतर्गत अंगीकृत असलेल्या ४९२ रूग्णालयांपैकी सध्या पुणे जिल्हयात २९ रूग्णालये अंगीकृत असून त्यात ०४ शासकीय व २५ खाजगी रूग्णालये अंगीकृत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.जुवाठी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील जमिन जुवाठी (लघुपाटबंधारे योजना) धरणाकरिता संपादीत केलेल्या फळझाडांच्या मुल्यांकनाचे देयक प्रलंबित असल्याबाबत**

**(२२) ९९२६४ (२६-१२-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.जुवाठी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील जमिन जुवाठी (लघुपाटबंधारे योजना) धरणाकरिता माहे २००९ मध्ये वा त्या दरम्याने संपादीत केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धरणातील संपादीत केलेल्या गट क्र.१९६१ व १८२७ या क्षेत्रातील फळझाडांच्या मुल्यांकनाचे देयक अद्यापपर्यंत देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे देयक मिळण्यासाठी अर्जदार मागील बऱ्याच वर्षापासून मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२३-०५-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) भुसंपादनाच्या अंतिम निवाड्यामध्ये गट क्र.१९६१ व १८२७ या क्षेत्रातील फळझाडांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नव्हत्या. त्यामुळे गट नं.१८२७ व १६९१ मधील फळझाडांचे मुल्यांकन प्रस्तावास शासन निर्णय दि.२९/०२/२०१२ अन्वये विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे. योजनेस रु.४१५.२८ लक्ष रक्कमेस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. योजनेचे व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठीचे रु.९६३.४२ लक्ष रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठीच्या अंदाजपत्रकामध्ये उपरोक्त फळझाडे मुल्यांकनाची रक्कम रु.७.६० लक्ष रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील महिला परिचरांना वेतनात वाढ मिळण्याबाबत

**(२३) ९९२७९ (०३-०१-२०१८). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामध्ये महिला परिचर नावाचे पद निर्माण करण्यात आले त्यावेळी परिचरांना आरोग्य परिचारिकेसोबत फारशी कामे नसल्याने हे पद मानधन स्वरुपात भरण्यात येऊ लागले. त्या काळात २० रुपये महिना मानधन सुरु करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य खात्यात महिला परिचरांना ४० रुपये मानधन मिळते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परीषद महिला परिचर कर्मचारी महासंघ सन १९८० पासून किमान वेतनाची मागणी करीत असुन यांच्या वेतनामध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

अंशकालीन स्त्री परिचर हे पद उपकेंद्रामध्ये आकृतीबंधानुसार निर्माण करण्यात आले आहे. या पदाचे मानधन प्रतिमहा सन १९९४ मध्ये रु.३००/- होते. सद्यस्थितीत अंशकालीन स्त्री परिचरांना शासन निर्णय दि.६/९/२०१० अन्वये रु.१२००/- प्रतिमहा मानधन मिळते.

(३) शासन निर्णय दि.१/१०/२००८ अन्वये अंशकालीन स्त्री परिचरांचे मानधन रु.९००/- करण्यात आले. तर दि.६/९/२०१० च्या शासन निर्णयान्वये त्यांचे मानधन रु.१२००/- करण्यात आले आहे. तसेच विविध लोकप्रतिनिधींच्या व संघटनाच्या मागण्यांनुसार अंशकालीन स्त्री परिचर यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत वेळोवेळी प्रस्ताव वित्त विभागाला सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव वेतन सुधारणा समिती -२०१७ च्या विचारार्थ सादर करण्याबाबत वित्त विभागाने अभिप्राय दिले आहे. वित्त विभागाच्या निर्देशानुसार संचालक, आरोग्य संचालनालय यांना वित्त विभागाच्या पोर्टलवर प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील कृषि विभागाला जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मिळालेल्या निधीबाबत

**(२४) १०००८७ (२६-१२-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात कृषि विभागाला जलयुक्त शिवार योजनेत एकात्मिक पाणलोट, वसुंधरा पाणलोट योजनांवर सन २०१४ ते २०१७ या कालावधीत किती निधी मंजूर केला आहे,

(२) असल्यास, सदर निधीमधून तालुका कृषि अधिकाऱ्यांनी किती योजना राबविल्या वा राबविण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०४-२०१८) :** (१) भिवंडी तालुक्यात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत बॅच १ मधील IWMP ०४ हा एकच प्रकल्प मंजूर असून त्यात प्रस्तावित करण्यात आलेली पाणलोट विकास कामे सन २०१३-१४ मध्ये पूर्ण झाल्याने जलयुक्त शिवार अभियानामध्ये सदर गावांचा समावेश नाही. यास्तव सन २०१४ ते २०१७ या कालावधीत जलयुक्त शिवार योजनेत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातील कामांवर निधी मंजूर झालेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ओरोस (जि.सिंधुदुर्ग) येथील एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत फेज-२ च्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्याबाबत**

**(२५) १००५३० (२६-१२-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओरोस (जि.सिंधुदुर्ग) येथील एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातंर्गत फेज-२ च्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुदतवाढ न दिल्याने सिंधुदुर्ग जिल्हयातील ३२ कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी मागील नियुक्तीची तारीख संपली असून महिनाभरात फेरनियुक्तीबाबत कोणतेच आदेश देण्यात आलेले नसल्याने पाणलोट कर्मचाऱ्यांनी धरणे आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
तदनुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (०९-०४-२०१८) :** (१), (२) व (३) नाही, हे खरे नाही.

(४) केंद्र शासनाच्या दि. २/११/२०१७ च्या पत्रानुसार बॅच २ साठीचा कालावधी दि. ३१.३.२०१८ पर्यंत निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार बॅच-२ मधील कार्यरत मनुष्यबळाच्या सेवा दि.३१ मार्च, २०१८ पर्यंत घेण्याबाबत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी दि.४.१.२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

---

**मोरेवाडी (ता.आष्टी, जि.बीड) येथील तलावाच्या दुरुस्तीबाबत**

**(२६) १००५८७ (२६-१२-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरेवाडी (ता.आष्टी, जि.बीड) येथील तलाव नादुरुस्त झाला असल्याने त्याच्या दुरुस्तीची मागणी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने मोरेवाडी येथील तलावाच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मोरेवाडी तलावाचे सांडवा बांधकाम फुटलेले असल्याने योजनेत संकल्पीत क्षमतेने पाणीसाठा होत नाही, त्याकरिता करण्यात आलेल्या सविस्तर संयुक्त मोजणी नुसार सदर तलावाच्या सांडवा व इतर अनुषंगीक कामांच्या दुरूस्तीच्या अंदाजपत्रकास लघुसिंचन

(जलसंधारण) विभाग, बीड कार्यालयाने तांत्रिक मान्यता दिली आहे. त्यास अनुसरून मोरेवाडी तलावाच्या दुरूस्ती कामाचा प्रस्ताव मुख्य अभियंता,पुणे यांचेमार्फत शासनास सादर करण्यात येत आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्रापणसूचीला मान्यता देण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

---

**राज्यात जलयुक्त शिवार अभियानात समावेश असलेल्या गावांसाठीच खोदाईच्या कामासाठी यंत्रसामुग्री देणा-या गावांना इंधनाच्या खर्चापोटी शासन आर्थिक मदत देण्याची अट शिथिल करण्याबाबत**

**(२७) १००८४९ (२६-१२-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात 'गाळमुक्त धरण गाळमुक्त शिवार' अभियानाला गती देताना लोकसहभागातून केल्या जाणाऱ्या खोदाईच्या कामासाठी यंत्रसामुग्री देणा-या गावांना इंधनाच्या खर्चापोटी शासन आर्थिक मदत देणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवार अभियानात समावेश असलेल्या गावांसाठीच ही मदत देण्याची अट आदेशात ठेवल्यामुळे समावेश न झालेल्या गावांना गाळ काढता येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेवून सदर आदेशातील उपरोक्त अट शिथील करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२४-०५-२०१८) :** (१) व (२) शासन निर्णय दि.०६ मे, २०१७ अन्वये गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेस मान्यता दिलेली असून या योजनेतंर्गत राज्यातील सर्व ठिकाणी २५० हेक्टर पेक्षा कमी लाभ क्षेत्र असलेल्या धरणांमधील गाळाची मागणी शेतकऱ्यांनी केल्यास गाळ काढण्यासाठी लागणाऱ्या इंधनाचा खर्च शासनाद्वारे केला जातो.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जवर्डी (ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) येथे जलयुक्त शिवार योजनेच्या निकृष्ट कामाबाबत**

**(२८) १०१६५२ (२६-१२-२०१७). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवर्डी (ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) येथे जलसंधारण स्थानिकस्तर दर्यापूर अंतर्गत गावतलावाचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे करण्यात आले नाही तसेच तलावामध्ये पाणी येण्यासाठी योग्य उपाय योजना करण्यात आली नसल्याने पाणीसाठा झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) सदरील जलयुक्त च्या चुकीच्या कामाबाबत चौकशी करून कार्यवाही करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी जिल्हास्तरावर मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावतलावाचे काम पूर्ण करून चुकीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१७-०५-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
जवर्डी (ता.अंजनगाव) येथील साठवण तलावामध्ये २४.३४ सघमी पाणीसाठा अपेक्षित होता. परंतु अत्यल्प पावसाळा झाल्यामुळे सदर तलावात पाणीसाठा होऊ शकला नाही.
(२) यासंदर्भात निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही असे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.
(३) प्रस्तुत साठवण तलावाचे उर्वरित काम प्रगतीपथावर असून काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यानंतरच कामाचे अंतिम देयक अदा करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा (जि.लातूर) येथील तावरजा व तेरणा नदीवर सिमेंट बंधाऱ्यांच्या मंजूरीबाबत**

**(२९) १०१९०६ (२६-१२-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नदी/ओढा/नाल्याचे पुनर्जीवन करण्यात आलेल्या गावाला प्रोत्साहन देण्यासाठी अभिसरणाच्या माध्यमातून कार्यक्रम राबविण्यास दिनांक ८ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी मुंबई येथे मा.जलसंधारण मंत्री यांचे अध्यक्षतेखाली लातूर जिल्ह्यातील प्राप्त प्रस्तावांस नदी पुनर्जीवन अंतर्गत नवीन सिमेंट बंधारे घेण्यास तत्वत: परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औसा (जि.लातूर) येथील तावरजा व तेरणा नदीवर सिमेंट बंधारे मंजूर झाले अथवा नाही, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर सिमेंट बंधाऱ्यांची कामे निश्चित किती कालावधीत सुरु करण्यात येणार आहे ?

**प्रा. राम शिंदे (१६-०४-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) लातूर जिल्हयातील निलंगा, शिरूर, अनंतपाळ, देवणी, औसा व रेणापूर तालुक्यातील तेरणा, तावरजा, मांजरा, धरणी व देव नदीवर संयुक्तपणे ३० सिमेंट नाला बांधासाठी रू.५०० लक्ष निधी वितरणास शासन पत्र दि.१०/८/२०१७ अन्वये तत्वत: मंजूरी देण्यात आली आहे. पावसाळयामुळे नदी/नाल्यास पाण्याचा प्रवाह असल्यामुळे सर्वेक्षणाचे काम होऊ शकले नाही. सर्वेक्षणाचे काम हाती घेऊन बंधाऱ्याचे साठवण क्षमता व आर्थिक मापदंड

यांची पडताळणी करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. पडताळणी नंतर आर्थिक मापदंडात बसणाऱ्या बंधाऱ्याचे अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक व प्रशासकिय मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल.

---

**मौजे पेठ (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथील पैनगंगा नदीवरील**
**कोल्हापुरी बंधारा कार्यान्वीत करणे बाबत**

**(३०) १०२०२२ (२६-१२-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पेठ (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथील पैनगंगा नदीवरील गत तीन वर्षापूर्वी ४५ लक्ष रूपये खर्च करून लघु पाटबंधारे विभागामार्फत बांधण्यात आलेला कोल्हापुरी बंधारा अदयाप पर्यंत कार्यान्वीत झाला नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोल्हापुरी बंधारा कार्यान्वीत करण्यासाठी व सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०४-०४-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मौजे पेठ (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथील पैनगंगा नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्याचे जवळपास ८० % काम पूर्ण झालेले असून सदर कामावर रु. ४२,१३,४३९/- इतका खर्च झालेला आहे. सदर योजनेचे काम सुरु असतांना श्री. सुखदेव शिवाजी राजगुरे व इतर तीन यांनी दिनांक ५/८/२०१४ रोजी कंत्राटदाराचे पोकलॅन्ड मशीनने को.प. बंधाऱ्याच्या डाव्या बाजुकडील स्लॅप व सेंट्रींग तोडले तसेच कंत्राटदाराच्या ऑफरेटरला जीवे मारण्याची धमकी दिली अशी तक्रार कंत्राटदाराने पोलीस स्टेशनला दिल्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट झाले आहे. करीता सदर योजना अपूर्ण अवस्थेत असून कार्यान्वीत झाली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील मांडवी नदीवर केटी बंधारा बांधण्याबाबत**

**(३१) १०२५८६ (०२-०१-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील ओतूर, रोहकडी आंबेगव्हाण, पाचघर, चिल्हेवाडी, अहिणवेवाडी, मांदारणे, कार्यक्षेत्र असलेल्या गावांमध्ये कायमस्वरूपी भासणारी पाणी टंचाई त्वरीत दूर होण्यासाठी मांडवी नदीवर केटी बंधारा बांधण्याबाबत मांडवी नदी पाणी हक्क बचाव कृती समितीने तसेच आंबेगव्हाण, पाचघर ग्रामपंचायतीनेही ठराव निर्गमित करून

मा.जलसंधारण राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास सविस्तर निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी मा.जलसंधारण राज्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधितांची एक बैठक होवून सदरहू बैठकीत कृती समितीने सादर केलेल्या मागण्याबाबत निर्णय घेण्यात आले असून मांडवी नदीवर मेंगाळवाडी व अन्य एका ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यास मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तात्काळ निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीनुसार मांडवी नदीवर दोन ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-०४-२०१८) :** (१), (२) व (३) होय.
(४) मांडवी नदीवर आंबेगव्हाण (पाचघर आमराई) या ठिकाणी को.प.बंधा-याचे सविस्तर सर्वेक्षण करुन रु.२३७.७१ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित को.प.बंधा-याची साठवण क्षमता १४०.८० स.घ.मी. असून प्रती स.घ.मी. किंमत रु.१,६८,८२८/- इतकी येत आहे. प्रचलितमापदंडानुसार प्रति स.घ.मी. किंमत रु.७७,७४४/- इतकी आहे. त्यामुळे सदर योजना आर्थिक मापदंडात सफल होत नाही. तसेच रोहकडी (वाघदरी चोंडीओढा) या ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट बंधारा योजनेसाठी सविस्तर सर्वेक्षण करुन रु.३२.०५ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित सिमेंट कॉक्रीट बंधा-याची साठवण क्षमता २१ स.घ.मी. इतकी असून प्रति स.घ.मी. किंमत रु. १,५२,६१९/- इतकी येत आहे. प्रचलित मापदंडानुसार प्रति स.घ.मी.किंमत रु.७७,७४४/- इतकी आहे. त्यामुळे सदर योजना आर्थिक मापदंडात सफल होत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर जिल्हयातील कृषी बंधाऱ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(३२) १०२८६४ (२६-१२-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील पाणलोट क्षेत्राचा कायापालट करून जमीन ओलिताखाली यावी याकरिता कृषी बंधाऱ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असून सदर बांधकामात गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्या शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०४-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मेहुणबारे, (जि.जळगाव) ग्रामीण रुग्णालय अधिपरिचारिका संवर्गातील पदांबाबत

**(३३) १०३५८३ (०६-०१-२०१८). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहुणबारे (जि.जळगाव) ग्रामीण रुग्णालय अधिपरिचारिका संवर्गातील ७ पदे मंजुर असून फक्त ३ पदे भरली असून ४ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भरण्यात आलेल्या ३ पदांपैकी १ अधिपरिचारिकेची बदली जिल्हा रुग्णालय, जळगाव येथे सन २०१६ मध्ये करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, फक्त २ अधिपरिचारिका कार्यरत असल्यामुळे ३० खाटांचे रुग्णालय चालविण्यात अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामीण रुग्णालय मेहुणबारे या रुग्णालयातील अधिपरिचारिकेची ०५ रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(५) अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) सन २०१६ मध्ये एका अधिपरिचारीकेची जिल्हा रुग्णालय, जळगाव येथे बदली झालेली होती परंतु त्यांना कार्यमुक्त करण्यात आलेले नव्हते
(३) व (४) हे खरे नाही.
सन २०१७ च्या सर्वसाधारण बदल्या व माहे ऑगस्ट २०१७ मध्ये सरळ सेवेद्वारे अधिपरिचारीकांची ६ पदे भरण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जलसंधारण विभागाच्या क्षेत्रीय रचनेमध्ये सर्व पाणलोट कर्मचाऱ्यांचा समावेश करण्याबाबत

**(३४) १०३७६३ (२६-१२-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, ग्रामीण पायाभूत विकास निधि प्रकल्प तसेच पश्चिम घाट विकास प्रकल्पात महाराष्ट्रात ४५०० पाणलोट कर्मचारी उच्चशिक्षित व अनुभवी

असे विविध पदावर कृषि आयुक्त स्तरावरुन (वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे) ते विभागीयस्तरावर, जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर गेल्या सात ते आठ वर्षापासून जल, जंगल जमीन, जनता आणि जनावर या मुलभूत घटकाच्या संवर्धन व विकासासाठी काम करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पासाठी केंद्राने मार्गदर्शन सूची ठरलेली असून त्याला वगळून पाणलोट कार्यक्रमातील उपजीविका पद कमी केले असून पाणलोट कामाच्या टक्केवारी नुसार काही कर्मचारी यांना अतिरिक्त ठरवून कामावरून काढून टाकण्यात आले असून पाणलोट प्रकल्पातील बँच क्र. १ व २ यांचे बहिर्गमन प्रक्रिया पूर्ण न करता बंद करण्यात येऊन १७८८ कर्मचारी बेरोजगार असून तर काही पाणलोट प्रकल्प स्वयंसेवी संस्थेला विलीन केल्याने पाणलोट क्षेत्रातील ३ कर्मचारी रोजगारीविना बेरोजगार झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत महाराष्ट्रात बँच क्र. १ २३९ प्रकल्प होते बँच क्र. २ ला महाराष्ट्र शासनाची वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या नोडल एजन्सीने केंद्र शासनाकडे मुदतवाढीसाठी माहे मार्च, २०१८ पर्यंत पाठविण्यात आलेला प्रस्ताव अद्यापही मंजूर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलसंधारण विभागाच्या क्षेत्रीय रचनेमध्ये सर्व पाणलोट कर्मचारी यांचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ?

**प्रा. राम शिंदे (२४-०५-२०१८) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेअंतर्गत ८ जानेवारी, २०१८ रोजी ११०४ इतके मनुष्यबळ कंत्राटी तत्वावर सेवापुरवठादार संस्थेमार्फत पाणलोट विकास कामाशी निगडीत कामासांठी कार्यरत आहे आणि पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१०-११ पासून सन २०१४-१५ पर्यंत ८८ इतके मनुष्यबळ कंत्राटी तत्वावर सेवापुरवठादार संस्थेमार्फत पाणलोट विकास कामाशी निगडीत कामांसाठी कार्यरत होते.

(२) बॅच ६ मधील उपजीविका तज्ञाऐवजी कनिष्ठ अभियंता पद भरण्याचा निर्णय झालेला आहे.

पाणलोट विकास कामे ७५ टक्के पूर्ण झालेल्या प्रकल्पातील ३ पदांऐवजी १ अथवा २ पदे कामाच्या आवश्यकतेप्रमाणे चालु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बॅच-१ चा कालावधी पूर्ण झाल्यानुसार प्रकल्पामधील मनुष्यबळाच्या सेवा समाप्त करण्यात आल्या बर्हिगमनाची प्रक्रिया व प्रशिक्षण मार्च, २०१७ पूर्वी करण्यात आले.

बॅच-२ बाबत केंद्र शासनाच्या दि. ११/०४/२०१७ च्या पत्रानुसार सप्टेंबर, २०१७ मध्ये कालावधी पूर्ण होत असल्यामुळे प्रकल्पातील मनुष्यबळाच्या सेवा समाप्त करण्यात आल्या तथापि केंद्र शासनाच्या दि.२/११/२०१७ रोजीच्या पत्रानुसार बॅच-२ साठी मार्च, २०१८ पर्यंत मुदत देण्यात आली.

(३) नाही.

केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झाली असून राज्यस्तरीय मंजूरी समितीची प्रस्तावास मान्यता मिळाली आहे.

(४) नाही. कार्यवाही करण्यात आली नाही.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास ही योजना केंद्र पुरस्कृत योजना आहे. सदर योजनेकरीता केंद्र शासनाने दिलेल्या सामाईक मार्गदर्शक सुचना (२०११) नुसार आवश्यक असणारे मनुष्यबळ, प्रकल्प कालावधीपर्यंत कंत्राटी तत्वावर घेण्यात आले आहे. मार्गदर्शक सूचना मुद्दा क्र. १७ येथे कायमस्वरुपी मनुष्यबळ तयार करण्यात येऊ नये अशा सूचना नमूद केल्या आहेत. केंद्र शासनाच्या दि.२.२.२०१७ च्या पत्रान्वये केवळ, सध्या कार्यरत व उपलब्ध मनुष्यबळाच्या मर्यादेत (Rationalization) काम करावे असे सूचित केले आहे.

---

**उरण तालुक्यातील (जि.रायगड) चिरनेरच्या इंद्रायणी डोंगर परिसराच्या आगीबाबत**

**(३५) १०५२६५ (०७-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) चिरनेरच्या इंद्रायणी डोंगर परिसराला माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत जैववनस्पती व पशुपक्षांना हानी पोहचली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही आग लागण्याची कारणे काय आहेत, अशा प्रकारे पुन्हा आगी लागू नये याकरिता कोणत्या खबरदारीच्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१८) :** (१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) चिरनेरच्या इंद्रायणी डोंगर परिसरातील मौजे कळंबसुरे वन सं.न. १६६ व १६७ मध्ये माहे जानेवारी, २०१८ मध्ये आग (वणवे) लागल्याचे निदर्शनास आलेले असुन त्यामध्ये एकूण ११.०० हे. क्षेत्र जळाले आहे.

(२) सदर आगीमध्ये अनेक पशु पक्ष्यांचे जनजीवन उद्ध्वस्त झाल्याचे तसेच डोंगरात असलेल्या औषधी वनस्पतीही जळून खाक झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) सदरची आग अज्ञात इसमाने लावली असून आरोपी मिळून आलेला नाही. त्याबाबत वनगुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. वनवणवा प्रभावीपणे नियंत्रीत करणेसाठी वनक्षेत्रात आग लागल्यानंतर वनविभागातील कर्मचारी व वनसंरक्षण समिती मधील सदस्यांच्या संयुक्त सहभागातून आग तात्काळ आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच समित्यांमधील सदस्य व क्षेत्रिय कर्मचारी यांचेमार्फत जनजागृतीद्वारे आगीच्या घटनेवर नियंत्रण ठेवले जाते. हॅलो फॉरेस्ट १९२६ हा टोल फ्री क्रमांक सुरु केल्याने ग्रामस्थाकडून माहिती प्राप्त होताच त्या आधारे तात्काळ घटनास्थळी पोहचून आगीवर नियंत्रण मिळवणे शक्य जाते.

---

**शासकीय वैद्यकीय सेवेत कार्यरत असताना खासगीत सेवा देणाऱ्यांमध्ये मेडिकल व मेयोच्या डॉक्टरांसह नागपुरातील ३९ डॉक्टरांचा सहभाग आढळल्याबाबत**

**(३६) १०६०१५ (०७-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय सेवेत कार्यरत असताना खासगीत सेवा देणाऱ्यांमध्ये मेडिकल व मेयोच्या डॉक्टरांसह नागपुरातील ३९ डॉक्टरांचा सहभाग आढळल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या डॉक्टरांवर शासन कोणती कारवाई करणार आहे वा केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०५-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) (३) व (४) हे खरे आहे. अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे महात्मा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत दाखल रुग्णावर खाजगी दवाखान्यात उपचार केले प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून संबंधित १ सहयोगी प्राध्यापक यांचेवर शिस्तभंगविषयक कारवाई सुरू करणेची बाब प्रस्तावित आहे. तसेच १ सहाय्यक प्राध्यापक यांचेवर शासन ज्ञापन दि.२३.०४.१८ अन्वये दोषारोप बजावून विभागीय चौकशी आदेशित केली आहे.

---

**मौजे मासेवाडी दुगनबाडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील पाझर तलावाबाबत**

**(३७) १०७१५० (३१-०३-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मासेवाडी दुगनवाडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील पाझर तलावास प्रशासकीय मान्यता व निधी मिळूनही तलावाच्या कामास अद्याप सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर तलावाचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२३-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बाधीत शेतक-यांनी या योजनेस तिव्र विरोध केल्याने, भुसंपादन करता आले नाही. योजनेच्या भुसंपादनाच्या अंतिम निवाड्याची कार्यवाही दिनांक २१/१०/२००६ रोजी पुर्ण करुन अंतिम निवाड्याची रक्कम रु.१४.१० लक्ष महसूल विभागास अदा करण्यात आली होती.

तथापि, बाधीत शेतक-यांनी रक्कम स्विकारण्यास ठाम विरोध केल्याने सदर रक्कम महसूल विभागाने परत केली आहे.
(३) बाधीत शेतकऱ्यांचा विरोध कमी करण्यासाठी शेतक-यांना योजनेचे महत्व पटवून देणेबाबत जलसंधारण व महसूल विभागामार्फत बैठका घेण्यात आल्या. तथापि ग्रामस्थ व शेतकऱ्यांचा ठाम विरोध असल्याने प्रत्यक्ष काम सुरु झाले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे व मुंबई या शहरांना जोडणारा अकोले तोलारखिंड या रस्त्याचे काम वनविभागाच्या मान्यते अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) १०७१८१ (३१-०३-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व मुंबई या शहरांना जोडणारा अकोले तोलारखिंड हा जवळचा रस्ता आहे मात्र वनविभागाची मान्यता न मिळाल्याने या रस्त्याचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच चोंढे ते घाटघर रस्ताही ठाणे व मुंबई या मार्गाला जवळचा रस्ता आहे तथापि वनविभागाच्या मान्यतेअभावी याही रस्त्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्यांना वनविभागाची मान्यता मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१८) :** (१) व (२) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत ठाणे व मुंबई या शहरांना जोडणारा अकोले तोलारखिंड तसेच चोंढे ते घाटघर रस्त्याचा प्रस्ताव वन विभागास प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोतुळ ते तोलारखिंड खिरेश्वर भुयारी मार्गाबाबतचा प्रस्ताव तयार करुन सादर करणेबाबत क्षेत्रिय स्तरावरुन सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे. तथापि, सदर प्रस्ताव अद्याप वन विभागास प्राप्त झालेला नाही. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रकल्प यंत्रणेकडून प्रस्ताव प्राप्त होताच वन विभागाकडून आवश्यक कार्यवाही तातडीने करण्यात येईल.

---

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (मेडीकल) गोंदियाच्या एमबीबीएस तृतीय वर्षाची मान्यता वाचविण्यासाठी नागपूरातील मेयो वैद्यकीयेच्या सात सहयोगी प्राध्यापकांच्या बदल्या गोंदिया वैद्यकीयमध्ये करण्यात आल्याबाबत**

**(३९) १०८६०६ (०७-०४-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (मेडीकल) गोंदियाच्या एमबीबीएस तृतीय वर्षाची मान्यता वाचविण्यासाठी नागपूरातील मेयो वैद्यकीयेच्या सात सहयोगी प्राध्यापकांच्या बदल्या गोंदिया वैद्यकीयमध्ये करण्यात आल्याबाबतची बाब माहे जानेवारी, २०१८ च्या सुरूवातीला निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रूग्णालयामधील सहयोगी प्राध्यापकाच्या बदली वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दिनांक १ जानेवारी, २०१८ ला रिक्त पदे न भरल्यामुळे त्याचा त्रास न्यायवैद्यकषास्त्र, क्ष-किरणशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, अस्थिव्यंग रोग, बालरोग व शरीरक्रियाशास्त्र विभागात उपचार घेणाऱ्या रूग्णांवर झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रूग्णालयामधील सहयोगी प्राध्यापकांच्या बदल्यामुळे मेडीकल ट्रामा केअर सेंटरचा 'इन्टरव्हेशनल रेडीओलॉजी' विभाग, वाढीव पीजीच्या जागा सुध्दा अडचणीत आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रूग्णालयामधील ट्रामा केअर सेंटरच्या अडचणी व वाढीव पीजीच्या जागेचा प्रश्न बघता संबंधीत विभागाच्या सहयोगी प्राध्यपकांच्या बदल्यास स्थगिती देण्याबाबत व अनुभवी सहयोगी प्राध्यापकांची तातडीने नेमणुक करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०५-२०१८) :** (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया या संस्थेच्या तृतीय वर्षाच्या मान्यतेसाठी भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार रिक्त पदे भरणे आवश्यक असल्याने शासन आदेश दि.१.१.२०१८ अन्वये इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील १ व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील ६ अशा एकूण ७ सहयोगी प्राध्यापकांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) उपलब्ध मनुष्यबळाच्या सहाय्याने इतर "इन्टरव्हेशनल रेडीओलॉजी" विभाग व रुग्णसेवा कार्यरत ठेवण्यात आली आहे. शासन आदेश दि.१.१.२०१८ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया येथे बदली करण्यात आलेल्या सहयोगी प्राध्यापकांपैकी बदलीविरुद्ध ३ अध्यापकांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठ येथे मूळ अर्ज दाखल केले आहेत. मात्र न्यायाधिकरणाने स्थगिती आदेश पारित केले नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चांदवड (जि.नाशिक) तालुक्यात राहुड उसवाड या पाटचारीचे काम कंत्राटदाराच्या दिरंगाईमुळे बंद पडल्याबाबत

**(४०) १०९३२० (०७-०४-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यात राहुड उसवाड या पाटचारीचे काम जिल्हा नियोजन समितीतून निधी उपलब्ध करून सुरू करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाटचारीचे काम हे कंत्राटदाराच्या दिरंगाईमुळे बंद पडलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पाटचारीचे काम तातडीने सुरू करण्यासह कामास विलंब लावणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२२-०५-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, नाशिक या कार्यालयाने वेळोवेळी पत्रव्यवहार करून संबंधित कंत्राटदारास काम सुरू करून,निविदा शर्तीनुसार गुणवत्तापुर्वक व मुदतीत काम पूर्ण करणेबाबत कळविले आहे.

दिनांक ०६/०२/२०१८ रोजी मंत्रालय, मुंबई येथे मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे अध्यक्षतेखाली विषयांकित कामाबाबत झालेल्या बैठकीतील निर्णयानूसार मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे यांनी दिनांक २३/०२/२०१८ रोजी क्षेत्रिय भेट देऊन संबंधित कंत्राटदारास तातडीने काम पूर्ण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच कंत्राटदाराने केलेल्या दिरंगाईसाठी निविदा शर्त २ नुसार त्यांस प्रतिदिन रू.१५,०००/- चा दंड, दि.२१/०२/२०१८ पासून सुरू करण्यात आला आहे.

---

### बाळापूर (जि.अकोला) तालुक्यात हजारो वृक्षांची तोड केल्याबाबत

**(४१) १०९४७२ (३१-०३-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (जि. अकोला) तालुक्यात हजारो वृक्षांची तोड केल्याचे माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१८) :** (१) यवतमाळ वनवृत्तातील अकोला वनविभागातंर्गत अकोला वनपरिक्षेत्रातील बाळापूर तालुक्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ “सी” लोहारा ते अंधुरा या द्विपदरीकरणाचे कामाकरीता वृक्षतोडीची परवानगी देणेत आलेली असून सदर द्विपदरीकरणाचे कामाकरीता वृक्षतोड करणेत आली आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी नियमानुसार परवानगी देणेत आलेली असल्याने चौकशी करणेचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाळोदी, रुई, गोस्ता, शेंदूरजना (अढाव), रतनवाडी, आमदरी (ता.मानोरा, जि.वाशीम) आदी परिसरात सागवान वृक्षांची तोड अवैधरित्या केल्याबाबत**

**(४२) १०९९५२ (०७-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाळोदी, रुई, गोस्ता, शेंदूरजना (अढाव), रतनवाडी, आमदरी (ता.मानोरा, जि.वाशीम) आदी परिसरात सागवान वृक्षांची तोड अवैधरित्या करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे संगनमताने सागवान वृक्षांची तोड करून तस्करी केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१८) :** (१) यवतमाळ वनवृत्तांर्गत अकोला वनविभागातील मानोरा वनपरिक्षेत्रांतर्गत पाळोदी, रुई, गोस्ता, शेंदूरजना (अढाव), रतनवाडी, आमदरी (ता.मानोरा, जि.वाशीम) आदी परिसरात मोठया प्रमाणात सागवान वृक्षांची अवैधरित्या तोड करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले नाही. प्रकरणी गावालगत झालेली वृक्षतोड स्थानिक लोकांकडून शेती, अवजारे, किरकोळ लहान इमारती लाकडाच्या घरगुती दैनंदिन गरजा भागविणेकरीता झालेचे निदर्शनास येते.

(२), (३) व (४) यवतमाळ वनवृत्तातील अकोला वनविभागांतर्गत मानोरा वनपरिक्षेत्रातील अधिकारी/ कर्मचारी यांचे संगनमताने सागवान वृक्षांची वृक्षतोड करुन तस्करी केले जात असलेचे निदर्शनास आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महागांव (जि.यवतमाळ) येथे निंबू, चिंच, बाभूळ व आंबा या मोठ्या झाडांची तोड होत असल्याबाबत**

**(४३) ११०५५६ (३१-०३-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव (जि.यवतमाळ) येथे निंबू, चिंच, बाभूळ व आंबा या मोठ्या झाडांची तोड होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०१८) :** (१) यवतमाळ वनवृत्तातील पुसद वन विभागातंर्गत महागाव वनपरिक्षेत्रातून जाणाऱ्या राज्य महामार्ग क्र.३६१ या महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम सुरु आहे. सदर रस्त्याचा प्रस्ताव वनसंवर्धन अधिनियम १९८० अन्वये केंद्र शासनाकडून तत्वत: मंजुरी प्रदान करणेत आली आहे. वनजमीनीवरील कोणत्याही प्रजातीची तोड करण्यात आलेली नाही.वनेत्तर जमिनीमधून रस्त्याच्या दोन्ही बाजूला भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरण मार्फत वृक्ष कटाईचे काम वृक्षतोड अधिनियमान्वये रितसर परवानगीने सुरु आहे. त्याव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी अवैध वृक्ष कटाई होत असल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) व (३) सदर क्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ चौपदरीकरणाचे कामास शासनाची मंजुरी असून सदर क्षेत्रामधील शासनाच्या विकास कामाकरीता वृक्षतोड अधिनियमान्वये परवानगीने होत असून व इतर ठिकाणी अवैध वृक्षतोड होत नसल्यामुळे दोषीवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मांगरुळ (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील डोंगराळ टेकडीवरील वृक्ष जाळल्याबाबत**

**(४४) ११०९४५ (१०-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मांगरुळ (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील डोंगराळ टेकडीवरील वृक्ष दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जाळण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या डोंगरावरील वृक्ष जाळणाऱ्यावर स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१८) :** (१) ठाणे वनविभागातील बदलापूर वनपरिक्षेत्रातील मौजे मांगरुळ येथे लोक सहभागातून घेण्यात आलेल्या रोपवनाला दिनांक १९.१२.२०१७ रोजी स.नं. १०६, ११३ व मौजे वसार स.नं.१३ रोपवन क्षेत्राला दुपारी १.३० वाजण्याचे सुमारास आग लागल्याचे आढळून आले आहे. त्यामध्ये ८ हेक्टर क्षेत्रावरील अंदाजे २० हजार रोपांना आगीची झळ बसल्याचे दिसून आले आहे.
(२) प्रकरणी तात्काळ दखल घेऊन वनपरिक्षेत्र अधिकारी बदलापूर, क्षेत्रीय कर्मचारी व ग्रामस्थांच्या मदतीने वनवणवा विझवण्यात आला. सदरच्या वनगुन्हयाबाबत भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये अज्ञात इसमाविरुध्द वनगुन्हा क्र.७ एफ/२०१७ दिनांक १९.१२.२०१७ अंतर्गत जारी केला आहे.

तसेच, सदरच्या वनगुन्हयातील अज्ञात इसमाविरुध्द हिल लाईन, पोलीस स्टेशन, उल्हासनगर-५ यांचेकडे दिनांक २०.१२.२०१७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील माहूर वन परिक्षेत्राअंतर्गत रामगड किल्ला परिसरातील जंगलात लागलेल्या आगीबाबत**

**(४५) १११९३२ (१०-०४-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील माहूर वन परिक्षेत्राअंतर्गत असलेल्या रामगड किल्ला परिसरातील जंगलामध्ये दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी अचानक आग लागून जंगलातील मौल्यवान सागवान वृक्षासह असंख्य वन्यजीव जळून गेल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने काय चौकशी केली आहे, चौकशीचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणातील दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१८) :** (१) दिनांक २८.१.२०१८ रोजी नांदेड जिल्हयातील माहूर वनपरिक्षेत्रातंर्गत माहूर नियतक्षेत्रातील वन सर्व्हे नं.८४ चे कक्ष क्र.१ A /२ मधील किल्ला क्षेत्रात आग लागल्याचे निदर्शनास आले आहे. सदर आगीत १ ते १.५ हे. क्षेत्रातील पालापाचोळा व गवत जळाले असून वन्यजीवाची हानी झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) व (३) सदर प्रकरणात भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये अज्ञात इसमाविरुध्द वनगुन्हा दिनांक २९.१.२०१८ अन्वये नोंद करण्यात आला आहे. प्रकरणातील अज्ञात आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जव्हार (जि.पालघर) तालुक्यात गेल्या वर्षभरापासून खैरांची कात काढून विक्री करणारी टोळी सक्रिय असल्याबाबत**

**(४६) ११२३१५ (३१-०३-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यात गेल्या वर्षभरापासून खैरांची कात काढून विक्री करणारी टोळी सक्रिय असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने शोध मोहिम केली आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती जणांना अटक व कारवाई करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) जव्हार वनविभागात खैरांची कात काढुन विक्री करणारी टोळी संक्रिय असल्याचे निदर्शनास आलेले नाहीत. अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांना दक्ष राहून वनाचे संरक्षणाबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) वरील प्रमाणे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वन कामगारांना गेल्या आठ महिन्यांपासून वेतन मिळालेले नसल्याबाबत**

**(४७) ११३०४० (३१-०३-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वन कामगारांना गेल्या आठ महिन्यांपासून वेतन मिळालेले नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच कामगारांचे निर्वाहभत्याची थकबाकीदेखील गेल्या दोन वर्षापासून सतत पाठपुरावा करुनही अदयाप मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार वन कामगारांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात वन विभागात वन अधिकाऱ्यांसह इतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त असलेल्या पदांबाबत**

**(४८) ११३९३० (३१-०३-२०१८). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन विभागात वन अधिकाऱ्यांसह इतर कर्मचाऱ्यांची सुमारे २२०० पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे,

माहे सप्टेंबर, २०१७ अखेर वन विभागातील २२३४ पदे रिक्त होती तथापि, मार्च, २०१८ अखेरच्या अहवालानुसार २२०३ पदे रिक्त आहेत.

(२), (३) व (४) मार्च २०१८ अखेरच्या अहवालानुसार २२०३ पदे रिक्त आहे. यामध्ये सामाजिक वनीकरण, वन्यजीव, कार्यआयोजना, शिक्षण व संशोधन विभागातील पदांचा समावेश आहे.

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| गट-अ | ६३८ | ५१५ | १२३ |
| गट-ब | ११२० | १०६२ | ५८ |
| गट-क | १६८०७ | १५१८१ | १६२६ |
| गड-ड | १५२५ | ११२९ | ३९६ |
| एकुण | २००९० | १७८८७ | २२०३ |

वनसंरक्षक व मुख्य वनसंरक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी भा.व.से. अधिकाऱ्यांची अनुक्रमे १४ वर्षे व १८ वर्षे सेवा पूर्ण होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे अधिकारी उपलब्ध नसल्याने सदर रिक्त पदे भरता येऊ शकत नाहीत. विभागीय वन अधिकारी यांची ३४ पदे रिक्त आहेत. सदरची पदे सहायक वनसंरक्षक संवर्गातून पदोन्नती भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सहायक वनसंरक्षकांची ५८ पदे रिक्त आहेत. रिक्त असलेली व ३१.०८.२०१८ पर्यंत रिक्त होणारी पदे विचारात घेऊन खुल्या प्रवर्गातील ८१ पदे वनक्षेत्रपाल संवर्गातून पदोन्नती देऊन भरण्यास कार्यवाही सुरु आहे. त्यापैकी वनक्षेत्रपालांची १९ पदे, क्षेत्र सर्व्हेक्षक ४ पदे, वनपाल ३५५ पदे वनरक्षक ५३१ पदे व सर्व्हेक्षक ४३ पदे रिक्त आहे. सदर पदे भरण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

---

### मुरूड जंजीरा (जि.रागयड) येथील वेळास्ते परिसरात बिबटयाचा मृत्यु झाल्याबाबत

**(४९) ११४४०४ (१०-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड जंजीरा (जि.रायगड) येथील वेळास्ते परिसरात एक मृत बिबटया पुरून ठेवण्यात आला असताना मृत बिबटयाची वैद्यकीय चाचणी करून मुरूड प्रादेशिक वनखात्याने माहिती गुप्त ठेवली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरबाबत वनखात्यामार्फत पोलीस केस दाखल करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय चौकशीनुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मुरुड जंजीरा येथील वेळास्ते परिसरात दिनांक ०४.०८.२०१४ रोजी एक मृत बिबट पुरुन ठेवलेल्या अवस्थेत आढळून आला आहे. सदर मृत बिबट्याचा वैद्यकीय चाचणी करुन सदर घटनेची माहिती गुप्त ठेवल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अन्वये वन्यजीव संबधी गुन्हयांचा तपास करण्याचा अधिकार व न्यायालयात प्रकरण दाखल करण्याचा अधिकार वन विभागाला आहे. प्रस्तुत प्रकरणी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ९,५० व ५१ अन्वये वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यावल-रावेर (जि.जळगाव) वन क्षेत्रातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(५०) ११५२४१ (१०-०४-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल-रावेर (जि.जळगाव) वनक्षेत्रातील रस्ते खराब असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांची दुरुस्ती वा नुतनीकरण करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) यावल-रावेर (जि.जळगांव) वनक्षेत्रातील वन रस्त्यांचा वनाधिकारी / कर्मचारी यांचेकडून गस्त आणि क्षेत्रीय कामासाठी नेहमी वापरण्यात येतात. वनररस्त्यांची देखभाल नियमितपणे करण्यात येते. वनक्षेत्रातील वन रस्त्यांची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्यात येते. यावल-रावेर जि.जळगांव वनक्षेत्रातील वन रस्त्यांचे नुतनीकरण प्रस्तावित नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**